४ । शनिवार दि. ११ जानेवारी २०२५ ♦ वर्ष ४४ वे ♦ अंक- ८२ ♦ पृष्ठे ♦ किंमत १ रुपया ♦ RNINO 39924/83

# विकसित भारत निर्मितीत युवकांची भूमिका निर्णायक-अनुप पाटील

देगलूर–देशाच्या विकासात तरुणाईची भूमिका महत्त्वाची असून युवकांनी कठोर अभ्यास करून नवीन कौशल्य आत्मसात करून चांगल्या नोकऱ्या शोधल्या पाहिजेत, तसेच नावीन्यपूर्ण कल्पना तयार करून स्वत चा व्यवसाय सुरू केला पाहिजे. युवा शक्ती विकसित भारताच्या निर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावू शकते असे प्रतिपादन देगलूरचे उपजिल्हाधिकारी अनुप पाटील यांनी केले. ते स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड आणि देगलूर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे देगलूर तालुक्यातील वेरगी येथे आयोजित केलेल्या सात दिवसीय विशेष युवक निवासी शिबीराच्या समारोप कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे सचिव डॉ कर्मवीर पोशट्टीदादा उनग्रतवार हे होते तर मुख्य अतिथी म्हणून अडत व्यापारी



शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश निवृत्तीराव पाटील बेम्बरेकर हे होते. या कार्यक्रमासाठी देगलूरचे तहसीलदार भरत सूर्यवंशी, गटविकास अधिकारी शेखर देशमुख यांच्यासह महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहन खताळ, सरपंच संतोष पाटील, देवेंद्र मोतेवार, रवींद्र धाडे, चंद्रकांत नारलावार, विजय उनग्रतवार, उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, डॉ.व्ही. डी. शेरीकर, पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील, ग्रामसेवक राजेश तोटावार, मुख्याध्यापक अशोक देवकते आदी मंचावर उपस्थित होते.

सर्वप्रथम महात्मा गांधी आणि संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली .या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय देवडे यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ आणि वेरगीचे सरपंच संतोष पाटील यांनी स्वागतपर विचार मांडले. कार्यक्रमाचे पाहुणे तथा मार्गदर्शक देगलूरचे गटविकास अधिकारी शेखर देशमुख यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची घडवणूक कशी होते यावर प्रकाश टाकून देगलूर महाविद्यालयाच्या शैक्षणिक कार्याचा गौरव केला. अध्यक्षीय समारोपात संस्थेचे सचिव डॉ. कर्मवीर पोशट्टीदादा उनग्रतवार यांनी राष्ट्रीय सेवा योजना स्थापने मागचा इतिहासावर प्रकाश टाकून विद्यार्थ्यांना घडविण्यामध्ये विशेष निवासी शिबीर महत्त्वाची भूमिका बजावतात असे म्हटले शेवटी प्रस्तुत शिबिरामध्ये राबविण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांची प्रशंसा करून शिबीर यशस्वी केल्याबद्दल विद्यार्थी, गावकरी, प्राध्यापक या सर्वांचे अभिनंदन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी डॉ. व्यंकट खटकुरे तर आभार कार्यक्रमाधिकारी प्रा. शिवचरण गुरुडे यांनी मानले. या कार्यक्रमाला कार्यक्रमाधिकारी प्रा. गणेश क्यादारे, डॉ. संतोष येरावार, तटामुक्ती अध्यक्ष मायलु कांबळे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष गजानन भोकसखेडे,ग्रामपंचायतचे सदस्य, राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समितीचे सदस्य, शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner